ePaper

# आता एकनाथ शिंदे यांच्या नावापुढे पक्षप्रमुख पद लागणार?

| वर्ष - 8 | अंक - 322 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- बुमराह दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध
- कोहलीचा पुतण्या गाजवणार मैदान
- पाकिस्तान, चीनचा नवा गट?
- हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे, पण...


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 1 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पाकला पाठिंबा देत भारताला अडचणीत आणणाऱ्या चीनला अद्दल घडवणार

# चीनच्या दादागिरीवर भारताची नवी खेळी!

## चीनच्या मुजोरीवर भारताने शोधला नामी उपाय, मुळीच नमणार नाही !

| नवी दिल्ली / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**प्रत्येक गोष्टीमध्ये पाकची बाजू घेत किंवा पाकला पाठिंबा देत भारताची पंगा घेत भारताला नमविण्याचा प्रयत्न करणाऱ्या चीनला मोठी अद्दल घडवण्यासाठी भारताने एक अफलातून खेळी खेळली आहे. या भारताच्या पावलामुळे चीन चांगलाच हादरला असून भारताशी काही अंशी चांगले संबंध करण्याचा प्रस्ताव चीनने दिला आहे.**



### चीनचा काटा काढणार..

वेळोवेळी भारताला असहकार्य करून किंवा भारतावर कुरघोडी करून भारताला अडचणीत आणणाऱ्या चीनचा काटा काढण्यासाठी भारताने मोठी खेळी केली आहे. त्यामुळे चीनवर आता गयावया करण्याची वेळ आली आहे.

### चीनची नको ती दादागिरी

अनपेक्षितपणे चीनने भारताला दणका देत 'रेअर अर्थ मटेरियल' चा पुरवठा कमी केला आहे, त्यामुळे भारतातील ऑटो आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योग धोक्यात आला आहे. चीनने हे पाऊल जाणून-बुजून टाकले असून भारत अडचणीत यावा हाच त्यामागील उद्देश आहे. त्यामुळे गेले महिनाभर भारतातील उद्योगपती काहीसे चिंतेत होते.

### जपानबरोबर केली हातमिळवणी !

चीनच्या या आडमुठ्या भूमिकेमुळे भारतातील स्मार्टफोन, इलेक्ट्रिक वाहनांमध्ये या मटेरियलचा वापर केला जातो. आता या मटेरियलचा तुडवडा निर्माण झाल्यास उत्पादन ठप्प होण्याचा धोका आहे. मात्र, आता भारताने यावर मार्ग काढला आहे आणि विविध करार करून जपानसोबत हातमिळवणी केली आहे.

### जपानी कंपन्यांकडून जोरदार स्वागत..

चीनच्या निर्णयानंतर आता भारताने यावर मार्ग शोधत जपानसोबत हातमिळवणी केली आहे. अनेक जपानी कंपन्या रेअर अर्थ मटेरियल आणि बॅटरीचा पुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे. रिलायन्स आणि अमारा राजा या कंपन्याही यात प्रवेश करण्याची शक्यता आहे. जपान बरोबर यासंदर्भात विविध करार करण्यात येत असून हे उद्योग सुरळीतपणे सुरू राहतील आणि चीनला त्याचा जोरदार दणका बसेल, अशी व्यवस्था भारताने केली आहे.

### डझनभर कंपन्या दिल्लीत दाखल!

एका खात्रीलायक वृत्तानुसार, डझनभराहून अधिक जपानी कंपन्या दिल्लीत पोहोचल्या आहेत, यात मित्सुबिशी केमिकल्स, सुमिमोटो मेटल्स अँड मायनिंग आणि पॅनासोनिक या बड्या कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्या जपानच्या औद्योगिक संस्था 'बॅटरी असोसिएशन ऑफ सप्लाय चेन' चा भाग आहेत. आता भारतीय कंपन्यांसोबत पार्टनरशीप करून रेअर अर्थ मटेरियल आणि इलेक्ट्रिक वाहन बॅटरीची पुरवठा चेन मजबूत करण्याच्या तयारीत आहेत. या कंपन्यांसोबत करार झाल्यास चीनवर अवलंबून असलेल्या भारताला नक्कीच दिलासा मिळणार आहे आणि ती चीनसाठी मोठी चपराक असेल.

### चीनला देणार असाही दणका !

पाकिस्तान बरोबर भारताचा संघर्ष झाला, त्यावेळी भारताने पाकिस्तानचे कंबरडे मोडण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा आणि शस्त्रास्त्रांचा वापर केला. आता भारताचे संशोधन आणखी पुढे गेले असून मिसाईल क्षेत्रातही दिमाखदार प्रगती झाली आहे. आता अग्नी-५ या भारताच्या मिसाईल मध्ये अफलातून बदल आणि संशोधन करण्यात आले आहे. सध्या हे मिसाईल पाच हजार किलोमीटर वरील लक्ष्या चा वेध घेते. नवीन संशोधनानुसार ते ७,५०० किलोमीटर वरील बंकर सुद्धा उद्ध्वस्त करू शकेल. जमिनीखाली १०० मीटर शत्रु लपून बसला असेल किंवा त्या ठिकाणी शस्त्रे व दारुगोळा ठेवला असेल, तरीही मिसाईल अचूक वेध घेणार आहेत.

### भारतीय कंपन्या करार करणार

रिलायन्स आणि अमारा राजा या भारतीय कंपन्या जपानी कंपन्यांशी कराराबाबत चर्चा करत आहेत, गेले आठवडाभर ही चर्चा सुरू असून ती अंतिम टप्प्यात आल्यानंतरच चीनचा काटा काढण्यात येणार असल्याचे माध्यमांना समजले. लिथियम-आयन बॅटरी, लिथियम आणि ग्रेफाइट या खनिजांच्या व्यापाराबाबतही चर्चा सुरु आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीसाठी या बॅटरी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अनेक कंपन्या करार करण्यासाठी आघाडीवर आहेत.

### चीनची मक्तेदारी असल्याने दादागिरी!

रेअर अर्थ मटेरियलवर चीनची मक्तेदारी आहे, ती संपवणे सोपे काम नाही. जागतिक लिथियम बॅटरी उत्पादनात चीनचा वाटा ८० टक्के आहे, तर जपानचा वाटा १० टक्के आहे. सध्या भारतातील ईव्ही कंपन्या चीनमधून बॅटरी आयात करतात. तसेच काही कंपन्या दक्षिण कोरिया आणि जपानमधून आयात करतात. चीनची मक्तेदारी यामुळे आहे की, चीनकडे मोठ्या प्रमाणात कच्चा माल आहे. त्यामुळे चीनची मक्तेदारी तोडणे अवघड आहे. पण, ती तोडण्याचा मोठा प्रयत्न भारत करत आहे. जपान बरोबर विविध करार करून ही उत्पादने भारतामध्येच करण्याचा मोठा प्रयत्न सुरू आहे.

# ‘जीवघेणी’ अवजड वाहने आता जप्त!

## पाच वर्षांतील माहिती संकलित; सहा महिन्यांत 140 जणांचा मृत्यू

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या हद्दीत प्रमुख रस्त्यांवर डंपर, ट्रक, मिक्सर अशा अवजड वाहनांना बंदी असतानाही ही वाहने सर्रास रस्त्यांवरून धावत आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, गेल्या वर्षी शहरात ३३४ प्राणांतिक अपघात (फेटल ॲक्सिडेंट) होऊन ३४५ जणांचा मृत्यू, तर यंदा जून महिनाअखेरीपर्यंत १४० जणांचा बळी गेला आहे.**



त्यामुळे अपघातास जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांचा परवाना रद्द केला जाणार आहे. तसेच, अपघातास कारणीभूत ठरलेल्या गेल्या पाच वर्षांतील अवजड वाहनांची माहिती संकलित करून ती वाहने जप्त करण्यात येणार आहेत. शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर डंपर, ट्रक, मिक्सर अशा अवजड वाहनांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी आहे. तरीही सर्रास बंदी आदेश धुडकावून अवजड वाहने शहरात येतात. गेल्या आठवड्यात सिंहगड रोड परिसरातील तुकाईनगर येथे ट्रकच्या धडकेत महाविद्यालयीन तरुणीचा मृत्यू झाला. त्यामुळे अवजड वाहनांमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न चर्चेत आला आहे.‘शहरात गंभीर स्वरूपाच्या अपघातांमध्ये सहा महिन्यांत १४० जणांचा अपघाती मृत्यू झाला आहे. बहुतांश अपघात अवजड वाहनांमुळे झाले आहेत. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये दुचाकीस्वारांची संख्या जास्त आहे. अपघाती मृत्यूस जबाबदार अवजड वाहनांचा परवाना रद्द करण्यात येणार आहे, तसेच गेल्या पाच वर्षांत अपघातास जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांची माहिती गोळा करून ती वाहने जप्त करण्यात येणार आहेत,’ अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. अवजड वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू आहे. बंदी आदेश धुडकावून शहरात येणाऱ्या अवजड वाहनांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. यामध्ये परवाना रद्द करणे, वाहन जप्त करणे, तसेच न्यायालयीन कारवाईचा समावेश आहे. अपघाती मृत्यूस जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांची माहिती घेऊन त्यांचा परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाणार आहे. पोलीस आणि प्रादेशिक परिवहन विभागाकडून ही कारवाई करण्यात येणार आहे.गंभीर अपघात, तसेच कोंडी सोडविण्यासाठी शहरात येणाऱ्या जड वाहनांना, तसेच मल्टिॲक्सल वाहनांना शहरातील सर्व मार्गांवर २४ तास प्रवेश बंदी करण्यात आली आहे. यामध्ये १० पेक्षा जास्तचाकी वाहने, कंटेनर, ट्रेलर अशा वाहनांचा समावेश आहे. सहा ते दहा चाकी ट्रक, टेम्पो अशा वाहनांना रेड झोन केलेले मार्ग वगळून रात्री ११ ते सकाळी ६ पर्यंत प्रवेश दिला जाणार आहे. या आदेशातून मुंबई- बंगळुरू बाह्यवळण मार्ग वगळण्यात आला आहे.शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. बंदी आदेश धुडकाविणाऱ्या अवजड वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल करण्यास सुरुवात केली आहे.

### अवजड वाहनांना 31 रस्त्यांवर बंदी

अपघात प्रकरणात वाहन मालकांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत पोलिसांनी ३० ते ३२ वाहनचालकांविरुद्ध गुन्हे दाखल केले असून, दंडात्मक कारवाईही केली आहे. अपघातास जबाबदार ठरलेल्या अवजड वाहनांचा परवाना रद्द केला जाणार आहे. तसेच, अपघातास कारणीभूत ठरलेल्या गेल्या पाच वर्षांतील अवजड वाहनांची माहिती संकलित करून ती वाहने जप्त करण्यात येणार आहेत.शहरातील गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर डंपर, ट्रक, मिक्सर अशा अवजड वाहनांविरुद्ध कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी आहे. तरीही सर्रास बंदी आदेश धुडकावून अवजड वाहने शहरात येतात.

# तोट्यातील मार्गांवरील बस बंद

## उत्पन्नवाढीसाठी ‘एसटी’च्या पुणे विभागाचे फेरनियोजन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) पुणे विभागाकडून बसचे फेरनियोजन केले जाणार असून, कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांवरील सेवा बंद केली जाणार आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडण्यात येणार असून, जुन्या बस सेवेतून काढून येत्या वर्षअखेरपर्यंत १५० नवीन बस ताफ्यात दाखल होणार आहेत.**




परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी ‘एसटी’ महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने फेरनियोजनाचे काम हाती घेतले आहे. पुणे विभागांतर्गत शहर आणि जिल्ह्यात १४ आगार आणि ४२ स्थानके असून, ८५० बस आहेत. यांपैकी ६४ इलेक्ट्रिक (शिवाई), ३६ व्होल्व्हो लक्झरी (शिवशाही) आणि २०० सीएनजी बस आहेत.

‘कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांची माहिती संकलित करण्यात येत आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडल्या जाणार आहेत. याबाबतचे नियोजन करण्यात येत आहे. जास्त उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांवर अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. याबाबत नवीन वेळापत्रक तयार केले जाणार आहे,’ असे एसटी महामंडळाच्या पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितले.ते म्हणाले, ‘सध्या ७० नवीन बस विविध आगारांतून लांब पल्ल्यांच्या ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे. येत्या वर्षअखेरपर्यंत सुमारे १५० बस ताफ्यात दाखल होणार आहेत. प्रमुख स्थानके आणि आगार या ठिकाणी होणारा देखभाल-दुरुस्ती खर्च, चालक-वाहक यांच्या वेळा आणि वेतन खर्च, सुरक्षिततेच्या अनुषंगाने उपाययोजना, सण आणि सुट्यांच्या कालावधीत प्रवासी संख्येत होणारी वाढ लक्षात घेऊन जादा फेऱ्यांचे नियोजन करण्यात येत ओह. त्यामुळे उत्पन्नात वाढ होईल.’स्वारगेट, शिवाजीनगर स्थानकांतून सोडण्यात आलेल्या बसमधून २०२४-२५ या आर्थिक वर्षात महामंडळाला सुमारे ५५ कोटी रुपयांचे मासिक उत्पन्न मिळाले. हे उत्पन्न मासिक ६५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यासाठी फेरनियोजन सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार तोट्यातील मार्गांवरील बस बंद केल्या जाणार आहेत.परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी ‘एसटी’ महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर केल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे विभागाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने फेरनियोजनाचे काम हाती घेतले आहे. पुणे विभागांतर्गत शहर आणि जिल्ह्यात १४ आगार आणि ४२ स्थानके असून, ८५० बस आहेत. यांपैकी ६४ इलेक्ट्रिक (शिवाई), ३६ व्होल्व्हो लक्झरी (शिवशाही) आणि २०० सीएनजी बस आहेत.‘कमी उत्पन्न मिळणाऱ्या मार्गांची माहिती संकलित करण्यात येत आहे.

### नवीन वेळापत्रक तयार केले जाणार

लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सोडल्या जाणार आहेत. मार्गांवर अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहेत. याबाबत नवीन वेळापत्रक तयार केले जाणार आहे,’ असे एसटी महामंडळाच्या पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया यांनी सांगितले.ते म्हणाले, ‘सध्या ७० नवीन बस विविध आगारांतून लांब पल्ल्यांच्या ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे.

## लोकसाहित्याच्या आदीम व्यवस्थेमध्ये

# मराठी भाषेचे मूळ!

## डॉ. अविनाश आवलगावकर यांचे प्रतिपादन

। तळेगाव दाभाडे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाषेचे मूळ शोधणे अवघड नसते. मौखिक परंपरेने जपत आलेले लोकसाहित्य हेच मूळ साहित्य असून, आपल्या लोकसाहित्याच्या आदिम व्यवस्थेमध्ये मराठी भाषेची मूळ शोधता येते, असे मत मराठी भाषा विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले.**




तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेच्या यशोदा काकडे इंजिनिअरिंग कॉलेजच्या सभागृहात साहित्य अकादमी आणि इंद्रायणी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'लोकरंगभूमी आणि अभिजात मराठी' विषयावरील एक दिवसीय परिसंवादात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक पद्मश्री वामन केंद्रे, ज्येष्ठ कादंबरीकार व साहित्य अकादमीच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्य विश्वास पाटील, लोककलेचे अभ्यासक डॉ. प्रकाश खांडगे, मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे, साहित्य अकादमीच्या प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नायर, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. मुकुंद कुळे, संतोष शेणई, सोपान खुडे, प्रभाकर ओव्हाळ, इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेचे कार्यवाह चंद्रकांत शेटे, सदस्या निरुपा कानिटकर, प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, तसेच संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. डॉ. आवलगावकर म्हणाले, की आपले आदिम जमातीचे नृत्य हे लोकरंगभूमीचे पहिले पाऊल म्हणता येईल. शास्त्रीयतेत 'घराणे' हा शब्द तयार होण्याच्या कितीतरी आधी लोकरंगभूमीने आपली एक स्वतंत्र परंपरा निर्माण केली होती, असे बोलून त्यांनी मराठीच्या आदिम परंपरेचा गौरव केला.

बीजभाषक म्हणून आपले मत मांडताना डॉ. प्रकाश खांडगे यांनी अभिजात भाषांनी बोलीभाषांना गावकुसाबाहेर ठेवले असल्याची खंत व्यक्त केली. अभिजात भाषेला ऊर्जा देण्याचे काम बोलीभाषा करत असतात. लोकरंगभूमीवरील अभिजात मराठी भाषा ही उस्फूर्त अशा पारंपरिक, लवचिक आणि प्रभावी बोली भाषेचेच एक रूप असल्याचेही त्यांनी सांगितले.

वामन केंद्रे म्हणाले की, प्रयोगरुपाने आविष्कृत होणारी भाषा म्हणजे रंगभाषा होय. लोकरंगभूमीवरील भाषेची क्षमता ही नाटक आणि सिनेमापेक्षा वेगळी आहे, हेच तिचे मोठे बलस्थान आहे. दृष्य, काव्य, सौंदर्याची अनुभुती कायमस्वरुपी मनावर कोरली जाते. ती सर्वोच्च रंगभाषा ठरते.

विश्वास पाटील म्हणाले, की पारंपरिक तमाशात बदल करुन स्थळ काळाचा स्वर लोककलाकारांनी पकडला पाहिजे. कुठलीही कला ही स्थळ काळाचा नवा स्वर जोपर्यंत पकडत नाही, तोपर्यंत ती जिवंत राहू शकत नाही. ती लोकांच्या भावनेचा किंवा आशा आकांक्षाचा आवाज होऊ शकत नाही. आज महाराष्ट्र अस्वस्थ आहे. मराठी भाषेवर, मुंबईवर वेगवेगळ्या क्षेत्रातल्या बादशहांची नजर पडते आहे. हे बादशहा आमची भाषा, संस्कृती, साहित्य गिळायला निघालेत. या कठीण काळात लेखक, कलावंत, अभ्यासक यांनी काळाची गरज म्हणून आपली मराठी भाषा आणि संस्कृती सांभाळायला हवी.

### भक्तीनाट्याची लोकभाषा अभिजात मराठी सत्र

या परिसंवादात विधीनाट्य आणि भक्तीनाट्याची लोकभाषा आणि अभिजात मराठी या सत्राचे अध्यक्षपद संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी भूषविले. ज्येष्ठ लोककला अभ्यासक व पत्रकार मुकुंद कुळे आणि संतोष शेणई यांनी अनुक्रमे विधीनाट्य व भक्तीनाट्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. समारोप सत्रात वगनाट्य, लोकनाट्य व तमाशाची रंगभाषा व अभिजात मराठी या विषयावर मान्यवरांनी चर्चा केली. या चर्चासत्राचे अध्यक्षपद डॉ. प्रकाश खांडगे यांनी भूषविले. मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख व सुप्रसिद्ध लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून तमाशा आणि अभिजात मराठी या विषयावर मार्गदर्शन केले. लोकनाट्य या विषयावर ज्येष्ठ लोककला अभ्यासक सोपान खुडे यांनी, तर लोकनाट्य विषयावर ज्येष्ठ लोककला अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ यांनी उपस्थित मार्गदर्शन केले. प्रास्ताविक इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी, स्वागत साहित्य अकादमीचे प्रभारी श्री ओमप्रकाश नागर यांनी केले सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. सत्यजित खांडगे यांनी, तर आभार कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संदीप भोसले यांनी मानले.

---

## कार्ला येथील एकवीरा देवीच्या दर्शनासाठी ड्रेस कोड लागू!

### श्री एकवीरा देवस्थान ट्रस्टचा निर्णय; सात जुलैपासून नियम लागू

। लोणावळा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळ्या जवळील वेहरगाव कार्ला येथील एकवीरा गडावरील कुलस्वामिनी आई एकवीरा देवी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी श्री एकवीरा देवस्थान ट्रस्टच्या वतीने नवीन ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. देवस्थान ट्रस्टच्या निर्णयानुसार हा ड्रेस कोडचा निर्णय सात जुलैपासून प्रत्यक्षात अमलात येणार आहे.**





देवस्थानच्या ट्रस्टच्या सर्वसाधारण सभेत देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ड्रेस कोडच्या अंमलबजावणी संदर्भातील विषय सभेत मांडण्यात आला. या महत्त्वपूर्ण विषयाचे आवल[illegible] करत या विषयाला एकमताने सहमती दर्शवत निर्णय मंजूर करण्यात आला. या सभेला ट्रस्टचे अध्यक्ष दिपक हुलावळे, प्रमुख विश्वस्त खासदार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे, उपाध्यक्ष सागर देवकर, सचिव नवनाथ देशमुख, सहसचिव महेंद्र देशमुख, सहखजिनदार विकास पडवळ तसेच विश्वस्त सरपंच पूजा अशोक पडवळ पदाधिकारी बैठकीला उपस्थित होते.

देवस्थान ट्रस्टच्या निर्णयानुसार मंदिरातील धार्मिक वातावरणाची पवित्रता टिकवण्यासाठी आणि पारंपरिक मूल्यांना सन्मान देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी भारतीय पारंपरिक पोशाख परिधान करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### ड्रेस कोडचे नियम पुढीलप्रमाणे असतील -

महिलांसाठी साडी, सलवार-कुर्ता किंवा अन्य भारतीय पारंपरिक पोशाख, तर पुरुषांसाठी धोतर-कुर्ता, पायजमा-कुर्ता, पँट-शर्ट किंवा पारंपरिक वेशभूषा याशिवाय मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्यांना वेस्टर्न ड्रेस, शॉर्ट्स, मिनी स्कर्ट्स, हाफ पँट्स, फाटलेली जीन्स यांसारखे पोशाख वर्ज्य करण्यात आले आहेत.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### ऐसा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम ॥

सा करावा काही नेम । जेणे जोडेल आत्माराम ॥ नेम असावा शाश्वताचा । जेणे राम कृपा करील साचा ॥ नेम असावा वाचा मन । जेणे संतुष्ट होईल रघुनंदन ॥ कर्तव्यात गुंतवावे शरीर । जेणे संतोषे रघुवीर ॥ सतीला नसे दुजे दैवत जाण । तिला पति एकच प्रमाण ॥ न पाहावे त्याचे दोष गुण । आपले कर्तव्य करावे जतन ॥ पतिव्रताधर्म श्रेष्ठ भारी । वंदिताती संत महामुनि ॥ पतिआज्ञा प्रमाण । हेच मुख्य साध्वीचे लक्षण जाण ॥ न बोलावे उणेपुरे । जे परमात्म्यास न आवडेल खरे ॥ संतति व संपत्ति । भगवत्कृपेने ज्याची प्राप्ति । त्याचे करावे रक्षण । पण न गुंतू द्यावे मन ॥ जे आवडेल पतीला पाही । तो तो आपला धर्मच राही ॥ मनाने करावे भगवंताचे स्मरण । जेणे चुकेल जन्ममरण ॥ अखंड राखावे समाधान । चुको न द्यावे अनुसंधान ॥ काया गुंतवावी प्रपंचात । मन असावे रघुनाथात ॥ प्रपंचात राखावी खबरदारी । मन लावावे रामावरी । त्याचा राम होईल दाता । न करावी कशाची चिंता ॥ मुखी असावे नामस्मरण । हृदयात भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव । शुद्ध राखावे आचरण । पवित्रतम अंतःकरण । मुखाने भगवंताचे स्मरण । त्यावर कृपा करील रघुनंदन । हा ठेवावा विश्वास । अनुभव येईल नक्की खास ॥ पतीस करावे एकदा तरी नमन । रामरूप जाणून ॥ त्याचे जाणावे मनोगत । तैसे वर्तणे हे आपले हित ॥ ऐसा नेम ज्याचे घरी । राम उभा त्याचे दारी ॥ आल्या अतिथा अन्न द्यावे । कोणास विन्मुख न पाठवावे । राम कर्ता हा ठेवा भाव । कमीपणाला नाही ठाव ॥ सर्वांचे उगमस्थान एक । हे धरावे चित्ती । त्याला नाही कशाची भीति । रामाविण न पाहावे जग । समाधानाची खूण हीच सत्य ॥ जे जे काही यावे । ते ते रामापासून आले । हा ठेवावा भाव॥ साक्षित्वाने देहाचा प्रपंच पाहावा । अंतरी रघुनाथ भजावा ॥ देहाची गति प्रारब्धाचे हाती । ऐसे शास्त्रे सांगती।

परि न येई हे चित्तीं । एकच जगती माझा रघुपति । मुखानें घ्यावे रामनाम । हृदयीं परमात्म्याचें प्रेम । याहून दुजा न करावा विचार । हा ठेवावा निर्धार । चातुर्मासांत करावी सुरुवात । अखंड चालवावा हा हेत ॥ थोडा नेम सांगतो कांही । तो करूनिया पाही ॥ घ्यावें भगवंताचें नाम । खात, पीत, करीत असता काम । होईल तेवढे करावें जतन । परमात्मा पुरे करील हे जाणावे ॥ सर्वांस सांगावे आशीर्वाद । सर्वांनी जोडावा भगवंत ॥

बोधवचन:- मागणे तुम्हा एकच पाही। नामावाचून दूर कधी न राही॥

# भाषावादाचे घोंगावणारे वादळ 'यु-टर्न' मुळे सध्या तरी शमले !





**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**हिंदी भाषा सक्तीच्या प्रकरणावरून उद्भवलेले वादंग सध्या तरी मिटले आहे. त्याला 'महायुती' सरकारचा यु-टर्न म्हणा किंवा ठाकरे बंधूंची सामंजस्याची भूमिका म्हणा, पण समाजावर घोंगावणारे वादळ सध्या तरी शमले आहे ! यामध्ये नेमका फायदा कोणाचा आणि तोटा कोणाचा याची समीकरणे राजकीय तज्ज्ञ खुशाल मांडोत, पण, यामध्ये उद्धव आणि राज या ठाकरे बंधूंचे हिंदुत्व मात्र जनतेला कळून चुकले आहे, हे नक्की!**

### ठाकरे बंधूंकडून स्वतःचीच गोची!

हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर लढताना दोन्ही ठाकरे बंधू आक्रमक होतेआणि एकत्र मोर्चा काढणार होते. पण, असे असले तरी दोघा ठाकरेंना कळून चुकले आहे, की त्यांच्या हिंदुत्वाच्या भूमिकेची त्यांनी स्वतःच गोची करून ठेवली आहे. आणि मग, घराण्याकडे असलेल्या जुन्या औषधाची आठवण त्यांना झाली! पुन्हा तेच जुने औषध.. भाषावाद !!

### देशापुढील समस्यांचे काय?

तिकडे बंगाल जळत आहे, बांगलादेशी घुसखोरांनी तिकडे अक्षरशः वक्फ कायद्यावरून भारतीयांशी युद्ध पुकारले आहे, पण दोघांपैकी एकसुद्धा ठाकरे यावर व्यक्त झालेले नाहीत. त्यांचा हक्काचा भोंगा सकाळी वाजलेला आठवत नाही. किती मोठी संधी आहे, बघा.. बंगालच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाहांवर टोमण्यांचे बाणावर बाण मारण्याची संधी उद्धव साहेब आणि संजय राऊत यांना आहे, तथापि, त्या विषयात अभ्यासा नसणाऱ्या या राजकारण्यांना मुळीच इंटरेस्ट दिसत नाही.

### बंगालमधील हिंदूंची दुरवस्था..

बंगालचा हिंदू 'त्राही माम' अवस्थेत असताना महाराष्ट्रात कोणत्याही राजकीय पक्षाचा एकही नेता असे म्हणालेला नाहीय की 'आम्ही बंगालच्या हिंदूंसोबत आहोत. जसे काश्मिरच्या बाबतीत चूक झाली, तशी बंगालच्या बाबतींत होऊ देणार नाही म्हणून! पण हल्ली झाले आहे काय, काहीही झाले तरी ते निपटण्यास केंद्र सरकार सक्षम आहे, त्यामध्ये आपला आणि आपल्या पक्षाचा फायदा असेल तरच मध्ये नाक खुपसायचे.. मोदी सरकारला कशी अक्कल नाही.. देवाने ती फक्त आपल्याला दिली आहे, याचा आणायचा आणि डायलॉग बाजी करत फड जिंकल्याच्या थाटात शड्डू ठोकायचा, हाच यांचा उद्योग झाला आहे !

### बांगलादेशी घुसखोरांचे काय ?

तसा विचार केला तर आपल्या इथे मुंबईत बांगलादेशी घुसखोर कमी आहेत का ? आज बंगाल मध्ये जे होत आहे तेच उद्या मुंबईत झालं तर, ही शंका या राजकारण्यांना भेडसावत असावी. हा प्रश्न ठाकरे यांच्या अखत्यारित नसावा, फायदा मिळवण्याची त्यांची गणिते ही ठाम असतात आणि त्यांच्या पद्धतीनेच ती सोडविली जातात.

### सध्या भाषावाद हवा आहे !

समजा, उद्या मुंबईत दंगल झाली, तरी मी मराठी किंवा मी हिंदी किंवा मी गुजराती, मी कशाला तुला वाचवू? अशी परिस्थिती निर्माण करायची आहे का..भाषावाद हा पूर्वीचा यशस्वी शब्द आहे. सध्याच्या समाजात रोटी-बेटी व्यवहार हे अंतर जातीय अंतर धर्मीय होऊ लागले असल्यामुळे भाषेचा संबंधच नाही, हे कोणीतरी या मंडळींना सांगण्याची गरज उद्भवली आहे. ज्या मुंबईमध्ये हे हिंदी भाषेच्या सक्तीला विरोध करत आहेत, त्या मुंबईत सध्या निम्म्यापेक्षा जास्त नागरिक बिगरहिंदी आहेत, हे लक्षात घ्यायला पाहिजे !

### मराठी माणूस आहेस कुठे?

मराठी, मराठी करून ही मंडळी मुंबईतच राहिली. देशोधडीला लागलेला मराठी माणूस मात्र मुंबई बाहेर फेकला गेला आहे. त्याची मालमत्ता विकत घेतलेले जैन, मारवाडी, गुजराती आणि उत्तर भारतीय म्हणजेच हिंदी भाषिक मुंबईकर झाले, ही वस्तुस्थिती आहे. मराठी माणूस मात्र इकडे डोंबिवलीच्या पुढे पार टिटवाळा, आसनगाव, कसारा.. अंबरनाथ, बदलापूर वांगणी कर्जत.. आणि तिकडे नालासोपारा, वसई विरार पालघर या ठिकाणी त्यातल्या त्यात स्वस्तात घरे शोधतो आहे. किती टक्के उरलाय मराठी माणूस मुंबईत ?

### मराठी माणूस आणि हिंदूंचे काय?

मराठी अस्मितेच्या नावाने मराठी भाषेचे शत्रू उभे केले गेले आहेत आणि मराठी-अमराठी भिंत उभी केली गेली आहे हिंदूंमध्ये! दादर जर राज ठाकरेंचा आणि वांद्रा उद्धव ठाकरेंचा गड असेल तर याचाही विचार करा. जा..दादर पश्चिम स्थानकापासून नक्षत्र मॉल, छबिलदास गल्ली, शिवाजी मंदिर पर्यंत..रस्त्याच्या कडेला लागलेल्या दुकानदारांशी मराठीत संवाद साधून दाखवा.. आणि हिम्मत असेल तर करा त्यांना मराठी भाषेची सक्ती ! वांद्रा पश्चिमेला रिक्षाचालकांशी, रस्त्याच्या कडेला फूटपाथवर उभे असलेल्या विक्रेत्यांशी मराठीत संवाद साधून दाखवा.. आणि नंतरच घाटकोपर मराठी करून दाखवण्याचे चॅलेंज द्या !

### भाषावाद करणाऱ्यांसाठी..

आधी आपापल्या भागात जाऊन स्वत:च्या गडाची तटबंदी भक्कम करून दाखवा, मग हे भाषावाद करून फोडाफोडीचे राजकारण करा.. स्वतः वेषांतर करून सोबत कोणताही लवाजमा न बाळगता सामान्य मराठी माणसाप्रमाणे उतरा मैदानात.. आणि खरोखर पाहा मराठीची किती हेळसांड चालली आहे ते आणि हिंदुत्वावर कसा घाला घातला जात आहे ते! मुंबईत प्रत्येक स्टेशनबाहेर, फूटपाथवर, स्कायवॉकवर धंदा लावून बसलेल्या विक्रेत्यांवर मराठी भाषेचा जोर काढून दाखवा.. मुंबईमध्ये तुमचे स्थान काय हेच तुम्हाला दाखवले जाईल, आणि मग भाषावादाला प्राधान्य द्या!

### आज काय चाललंय देशात ?

ही वेळ राजकरण करण्याची नाही, हे समजू शकतो, तर धर्मकारण करण्याची आहे! तुमची पक्षीय दुकाने वाचवण्याची तर नक्कीच नाही. आपला देश आणि धर्म वाचवण्याची आहे, हे लक्षात घ्या!

### आणि शेवटी प्रेमाचा सल्ला..

राज आणि उद्धव ठाकरे बंधूंनो.. एकत्र येताय ? अवश्य या. वंदनीय बाळासाहेब मराठी माणूस तुमच्या पाठीशी नक्कीच उभा राहील. एकत्र होऊन जा बंगालमध्ये.. आवाहन करा आणि घेऊन जा इकडून हिंदूंची फौज.. या फौजेचे नेतृत्व करा आणि डरकाळी फोडून तिकडच्या हिंदूंना सांगा.. 'आम्ही दोघे ठाकरे बंधू, बाळासाहेबांच्या हिंदुत्ववादी विचारांचे वारसदार आणि हा अवघा महाराष्ट्र तुमच्या सोबत आहे म्हणून..कोण तुम्हाला हात लावतो तेच बघतो !' अशा तुमच्या डरकाळ्या आणि गर्जना ऐकू आल्या तर संपूर्ण महाराष्ट्र आणि मराठी माणूसच काय, देशातील तमाम हिंदू बांधव देखील तुमच्या निवासस्थानांपुढे रांग लावून उभे राहतील, आशीर्वाद देण्यासाठी !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# माउलींच्या पालखीचे सोलापूरत स्वागत!

## पालखीचे पुरंदवडेत आज सोहळ्यातील पहिले गोल रिंगण

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**टाळ-मृदंगाचा गजर आणि हरिनामाचा जयघोष अशा भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे स्वागत सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर केले. या वेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री आणि प्रशासनातील अधिकारी यांनी पालखीचे दर्शन घेऊन पायी चालून वारकऱ्यांसोबत टाळ-मृदंगावर ठेकासुद्धा धरला. माउलींचा पालखी सोहळा नातेपुते येथे मुक्कामी असून मंगळवारी पुरंदवडे येथे पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण होणार आहे.**



आषाढी वारी सोहळ्यात विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन आळंदी येथून निघालेल्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील धर्मपुरी येथे आगमन झाले. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालखीचे स्वागत करून माउलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री गोरे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, अमित माळी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. माउलींच्या पालखी तसेच सोहळ्यातील अश्वाचे पूजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.जिल्ह्यातील पालखी प्रवेशानंतर माउलींची पालखी पाटबंधारे विभागाच्या विश्रामगृह येथे विसाव्यासाठी थांबली असता पालखीच्या दर्शनासाठी परिसरातील वारकरी, भाविक व ग्रामस्थांनी अलोट गर्दी केली होती. यानंतर पालखी पुढे नातेपुते येथे मुक्कमी पोहोचली. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात माउलींच्या पालखीचे आगमन सकाळी १०.४५ वाजता धर्मपुरी बंगला येथे झाले. तत्पूर्वी, सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी यासणी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोषी, फलटणचे उपविभागीय अधिकारी प्रियांका आंबेकर यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी माउलींच्या पालखीला भावपूर्ण निरोप दिला. दरम्यान, मंगळवारी म्हणजे आज नातेपुते येथून मंगळवारी माउलींची पालखी पुढे मार्गक्रमण करून मांडवी ओढा येथे विसावा घेईल. त्यानंतर पुरंदवडे येथे पालखी सोहळ्यातील पहिले गोल रिंगण होणार आहे.पालखी स्वागतानंतर पालकमंत्री गोरे व प्रशासनातील अधिकारी व लोकप्रतिनिधींनी हरिनामाचा गजर करीत पालखी सोहळ्याबरोबर काही अंतर चालत गेले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे व त्यांच्या पत्नी सोनिया यांनी फुगडी खेळत रामकृष्ण हरी, विठ्ठल विठ्ठल नामाचा जयघोष केला.

### पहिले गोल रिंगण होणार

तसेच पालकमंत्री महोदय व माजी आमदार राम सातपुते यांनीही फुगडी खेळली.संत तुकाराम महाराज पालखी प्रवेशमंगळवारी एकीकडे माउलींचे पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होणार आहे, तर दुसरीकडे संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथे प्रवेश करणार आहे.पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालखीचे स्वागत करून माउलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. धर्मपुरी येथे पालखी स्वागतासाठी पालकमंत्री गोरे यांच्यासह खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, अमित माळी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ५० हजार कोटींच्या घोटाळ्यात तुमचाही वाटा असेल

## लोकप्रतिनिधींना ‘शक्तीपीठ’विरोधात एकत्र येण्याचं राजू शेट्टींचं आवाहन

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी हे सातत्याने शक्तीपीठ महामार्गाला विरोध करत आहेत. त्यांनी या महामार्गाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. तसेच त्यांनी कोल्हापूर व सांगलीमधील कारखानदार व लोकप्रतिनिधिंना या आंदोलनात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे. शेट्टी यांनी समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ जारी केला आहे. या व्हिडीओद्वारे त्यांनी उद्या (मंगळवार, १ जुलै) शिरोलीतील पंचगंगा नदीच्या पुलावर आंदोलनासाठी जमण्याचं आवाहन केलं आहे.**

राजू शेट्टी म्हणाले, “नदी प्रवाहात अडथळा निर्माण होऊन कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील नद्यांच्या पाण्याची गती मंदावली आहे. जिल्ह्यांमधील पंचगंगा, दूधगंगा, वेणगंगा, वारणा व कृष्णेसह इतर नदी पात्रांमध्ये गाळ व वाळू साठली आहे. नदीपात्र सपाट होत चाललं आहे. दुसऱ्या बाजूला शक्तीपीठ महामार्गाच्या माध्यमातून कर्नाळ ते गारगोटी या ८५ किलोमीटरच्या परिसरात ३५ ते ४० किलोमीटर लांबीचा भराव पडणार आहे. परिणामी नदीच्या पाण्याला आणखी अडथळा निर्माण होणार आहे. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात ६० हजार एकर जमीन क्षारपट झाली आहे. पुढील आठ-दहा वर्षांमध्ये शक्तीपीठ महामार्गामुळे एक लाख एकर जमीन क्षारपट



होईल. त्यामुळे शेतीचं प्रचंड नुकसान होईल.”स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष म्हणाले, “गेल्या वर्षी केवळ ८६ दिवस साखर कारखाने चालले. शक्तीपीठ महामार्गामुळे १५ ते २० टक्के जमिनीचं नुकसान होईल. परिणामी ऊस उत्पादन कमी होईल आणि कारखाने चालणं आणखी कमी होईल. त्यामुळेच आमचा शक्तीपीठ महामार्गाला विरोध आहे. तसेच हा अव्यवहार्य मार्ग आहे. या महामार्गाच्या कामात मोठा भ्रष्टाचारही होणार आहे. केवळ सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा विचार केला असता गरिबांवर, शेतकऱ्यांवर व येथील उद्योगधंद्यांवर आक्रमण करणारा, इथल्या लोकांना उद्ध्वस्त करणारा असा हा रस्ता आहे. त्यामुळे आमचा त्याला विरोध आहे. येथील कारखानदारांनी देखील सरकारला विरोध केला पाहिजे. कारखानदारांनी सरकारला घाबरण्याचं कारण नाही. तुमच्या मिशीला कुठं खरकटं लागलं नसेल तर विरोध करा.”माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी हे सातत्याने शक्तीपीठ महामार्गाला विरोध करत आहेत.

### महामार्गविरोधात आंदोलनाचा इशारा

राजू शेट्टी म्हणाले, “मला येथील लोकप्रतिनिधींना सांगायचं आहे की तुमच्यापैकी अनेकांनी याआधी सरकारला शक्तीपीठ महामार्गाला विरोध दर्शवणारी पत्रं दिली आहेत. मात्र, आता तुम्ही मूग गिळून गप्प बसू नका. तुम्ही गप्प बसलात तर या रस्त्याच्या कामात होणाऱ्या भ्रष्टाचारात, ५० हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्यात तुमचाही हिस्सा आहे असं जनतेला वाटेल. तुमच्या हेतूंबद्दल जनतेच्या मनात संशय निर्माण होईल. त्यामुळेच १ जुलै रोजी शेतकरी दिनानिमित्त आपण सर्वजण मिळून या महामार्गाचा विरोध करुया. मंगळवारी सकाळी ११ वाजता पुणे -बंगळुरू महामार्ग पंचगंगा पूल शिरोली या ठिकाणी सर्वजण हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून आंदोलन करू.”माजी खासदार व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी हे सातत्याने शक्तीपीठ महामार्गाला विरोध करत आहेत. त्यांनी या महामार्गविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# पाकिस्तान, चीनचा नवा गट?

## ‘सार्क’ऐवजी नव्या प्रादेशिक राष्ट्रगट स्थापनेचा प्रयत्न

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सध्या निष्क्रिय असलेल्या दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेची (सार्क) जागा घेणारा नवा प्रादेशिक राष्ट्रगट तयार करण्यासाठी पाकिस्तान आणि चीन प्रयत्न करत आहेत, असे वृत्त पाकिस्तानातील ‘द एक्स्प्रेस ट्रिब्यून’ या वर्तमानपत्राने सोमवारी दिले. चीनच्या कन्मिंग येथे चीन, पाकिस्तान व बांगलादेशदरम्यान त्रिपक्षीय चर्चेत हाही विषय असल्याचे वृत्त आहे.**



या घडामोडींशी संबंधित सूत्रांचा हवाला देऊन ‘द एक्स्प्रेस ट्रिब्यून’ने आपल्या वृत्तात नमूद केले आहे की, नव्या राष्ट्रगटाच्या स्थापनेसाठी पाकिस्तान आणि चीनदरम्यानची चर्चा प्रगत टप्प्यावर आहे. प्रादेशिक अखंडता आणि दळणवळणासाठी सार्कची जागा घेणाऱ्या नव्या राष्ट्रगटाची गरज आहे यावर दोन्ही देशांचे एकमत आहे. ‘सार्क’मध्ये भारत, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, भूतान, मालदीव, अफगाणिस्तान आणि श्रीलंकेचा समावेश आहे.‘सार्क’च्या इतर सदस्य देशांनाही नव्या राष्ट्रगटात सामावून घेण्याचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीनेच चीनमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगलादेश यांच्याबरोबर चर्चा झाल्या आहेत. मात्र, बांगलादेश, चीन आणि पाकिस्तानदरम्यान कोणतीही आघाडी होण्याची शक्यता बांगलादेशच्या हंगामी सरकारने फेटाळून लावली आहे. सूत्रांनी ‘द एक्स्प्रेस ट्रिब्यून’ला दिलेल्या माहितीनुसार, या नव्या राष्ट्रगटामध्ये सहभागी होण्यासाठी भारताला आमंत्रित केले जाईल.‘सार्क’ची अखेरची द्वैवार्षिक शिखर परिषद २०१४मध्ये काठमांडू येथे झाली होती. पुढील परिषद २०१६मध्ये इस्लामाबाद येथे होणार होती. मात्र, त्या वर्षी उरीमध्ये लष्कराच्या छावणीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने परिषदेत सहभागी होण्यास असमर्थता दर्शवली. त्यापाठोपाठ बांगलादेश, भूतान आणि अफगाणिस्ताननेही सहभागास नकार दिल्याने परिषद अखेर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर ‘सार्क’ची परिषद झालीच नाही.जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद हा विधिवत संघर्ष असल्याचा दावा पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी केला आहे. या संघर्षात पाकिस्तान नेहमीच काश्मिरी जनतेबरोबर असेल असेही ते म्हणाले. स्वातंत्र्यासाठी वैध आणि कायदेशीर लढ्याला आंतरराष्ट्रीय कायद्याची मान्यता आहे असा दावाही मुनीर यांनी केला. यापूर्वीही त्यांनी काश्मीर ही पाकिस्तानच्या कंठातील रक्तवाहिनी असल्याचे म्हटले होते. भारताने पुन्हा हल्ला केल्यास उत्तर देण्याची धमकीही त्यांनी दिली.या घडामोडींशी संबंधित सूत्रांचा हवाला देऊन ‘द एक्स्प्रेस ट्रिब्यून’ने आपल्या वृत्तात नमूद केले आहे की, नव्या राष्ट्रगटाच्या स्थापनेसाठी पाकिस्तान आणि चीनदरम्यानची चर्चा प्रगत टप्प्यावर आहे. प्रादेशिक अखंडता आणि दळणवळणासाठी सार्कची जागा घेणाऱ्या नव्या राष्ट्रगटाची गरज आहे यावर दोन्ही देशांचे एकमत आहे. ‘सार्क’मध्ये भारत, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, भूतान, मालदीव, अफगाणिस्तान आणि श्रीलंकेचा समावेश आहे.‘सार्क’च्या इतर सदस्य देशांनाही नव्या राष्ट्रगटात सामावून घेण्याचा प्रयत्न आहे. त्या दृष्टीनेच चीनमध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान,मात्र, बांगलादेश, चीन आणि पाकिस्तानदरम्यान कोणतीही आघाडी होण्याची शक्यता बांगलादेशच्या हंगामी सरकारने फेटाळून लावली आहे.

### ‘सार्क’ 11 वर्षांपासून निष्क्रिय

सूत्रांनी ‘द एक्स्प्रेस ट्रिब्यून’ला दिलेल्या माहितीनुसार, या नव्या राष्ट्रगटामध्ये सहभागी होण्यासाठी भारताला आमंत्रित केले जाईल.‘सार्क’ची अखेरची द्वैवार्षिक शिखर परिषद २०१४मध्ये काठमांडू येथे झाली होती. पुढील परिषद २०१६मध्ये इस्लामाबाद येथे होणार होती. मात्र, त्या वर्षी उरीमध्ये लष्कराच्या छावणीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने परिषदेत सहभागी होण्यास असमर्थता दर्शवली. त्यापाठोपाठ बांगलादेश, भूतान आणि अफगाणिस्ताननेही सहभागास नकार दिल्याने परिषद अखेर रद्द करण्यात आली होती. त्यानंतर ‘सार्क’ची परिषद झालीच नाही.जम्मू आणि काश्मीरमधील दहशतवाद हा विधिवत संघर्ष असल्याचा दावा पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांनी केला आहे. या संघर्षात पाकिस्तान नेहमीच काश्मिरी जनतेबरोबर असेल .

# भारतासोबतचा दीर्घकाळ सीमावाद गुंतागुंतीचा!

## राजनाथ सिंग यांच्या दौऱ्यानंतर सीमा मुद्दा सोडवण्यासाठी चीनचा पुढाकार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**चीनने सोमवारी म्हटले आहे की, भारतासोबतचा त्यांचा दीर्घकाळचा सीमावाद “गुंतागुंतीचा” आहे आणि तो सोडवण्यासाठी वेळ लागेल. पण, त्यांनी सीमारेषा निश्चित करण्यासाठी आणि सीमा भागात शांतता राखण्यासाठी चर्चा करण्याची तयारी दर्शविली आहे.**



२६ जून रोजी चीनच्या किंगदाओ येथे शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेच्या वेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर चीनकडून हे पाऊल उचलण्यात आले आहे.द्विपक्षीय चर्चेदरम्यान, राजनाथ सिंह यांनी प्रस्ताव दिला होता की भारत आणि चीनने एका रोडमॅप अंतर्गत “गुंतागुंतीचे प्रश्न” सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्यासाठी पावले उचलण्याचे आणि सीमा निश्चित करण्यासाठी यंत्रणा पुन्हा सक्रिय करण्याचे आवाहन केले होते.राजनाथ सिंह यांच्या दोन्ही देशांनी आधीच विशेष प्रतिनिधी यंत्रणा स्थापन केली आहे आणि सीमा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राजकीय निकष व मार्गदर्शक तत्त्वांवर सहमती दर्शविली आहे. “सीमा प्रश्न गुंतागुंतीचा आहे आणि त्याचे निराकरण होण्यास वेळ लागेल,” असे माओ यांनी बीजिंगमध्ये पत्रकारांना सांगितले. पण, माओ म्हणाले की, “सकारात्मक बाजू अशी आहे की दोन्ही देशांनी ठोस चर्चेसाठी विविध पातळ्यांवर यंत्रणा आधीच स्थापन केल्या आहेत.माओ यांनी चीनच्या सतत संवादासाठी तयारीचा पुनरुच्चार केला आणि म्हटले की, “सीमारेषा निश्चित करण्यासाठी चर्चा आणि सीमा व्यवस्थापनासह इतर मुद्द्यांवर भारताशी संवाद सुरू ठेवण्यास, सीमावर्ती भागात शांततापूर्ण वातावरण राखण्यास आणि सीमापार देवाणघेवाण व सहकार्याला प्रोत्साहन देण्यास चीन तयार आहे.”

### गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये चर्चेचा २३ वा टप्पा पार पडला, जो २०२० मध्ये पूर्व लडाखमध्ये झालेल्या सीमा तणावानंतरचा पहिलाच संवाद होता. त्या बैठकीत, दोन्ही बाजूंनी ऑक्टोबर २०२४ च्या सैन्य माघारी घेण्याच्या कराराच्या अंमलबजावणीला सकारात्मक मान्यता दिली होती, ज्यामुळे संबंधित भागात गस्त घालणे आणि चराईला परवानगी देण्यात आली होती.शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या संरक्षण मंत्र्यांच्या परिषदेच्या वेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांच्याशी केलेल्या चर्चेनंतर चीनकडून हे पाऊल उचलण्यात आले आहेसिंह यांनी प्रस्तावा दिला होता की भारत आणि चीनने एका रोडमॅप अंतर्गत “गुंतागुंतीचे प्रश्न” सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

# बॉबी डार्लिंगचा भारतीय क्रिकेटपटूबाबत मोठा खुलासा

भारतीय संघाने २०११ साली वनडे वर्ल्डकप जिंकत अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान पटकावला होता. दरम्यान २०११ च्या वर्ल्डकप विजेत्या संघातील एका खेळाडूवर बॉलीवूड अभिनेत्री पाखी शर्मा हिने धक्कादायक आरोप केले आहेत. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत टीम इंडियाच्या स्टार खेळाडूवर तिने 'वन नाईट स्टॅन्ड' केल्याचा मोठा दावा केला आहे. बॉलीवूड अभिनेत्री पाखी शर्मा ही इंडस्ट्रीमध्ये बॉबी डार्लिंग या नावाने ओळखली जाते. अनेक हिंदी सिनेमांमध्ये दिसणारी बॉबी ही ट्रान्सजेंडर अभिनेत्री आहे. बॉबी डार्लिंग ही तिने दिलेल्या मुलाखतीमुळे सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. तिचं एकेकाळी भारतीय संघाच्या स्टार क्रिकेटपटूबरोबर अफेयर असल्याचं गाजलं होतं. आता तिने दिलेल्या मुलाखतीत त्यांचं नातं का तुटलं, याबाबत खुलासा केला आहे.'बॉलिवूड ठिकाना'ला दिलेल्या मुलाखतीत बॉबी डार्लिंगने धक्कादायक खुलासे केले आहेत. अभिनेत्रीला या मुलाखतीत विचारण्यात आलं की, तिचं नाव एकदा आघाडीच्या क्रिकेटपटूसह जोडलं गेलं होतं, तर ती नेमकी कहाणी काय आहे? यादरम्यान उत्तर देताना तिने स्वत: क्रिकेटपटूच्या नावाचा उल्लेख केला. हा



क्रिकेटपटू म्हणजे मुनाफ पटेल.बॉबी या मुलाखतीत म्हणाली, "आम्ही चांगले मित्र होतो. आम्ही अशोका हॉटेलच्या एका क्लबमध्ये भेटलो होतो. नंतर अनेकदा आम्ही क्लबिंग केलं, ड्रिंक्ससाठी भेटलो आणि मग पार्टी वगैरे आलो. कदाचित लोकांनी पाहिलं असावं किंवा कोणाबरोबर तरी बोलताना माझ्या तोंडून निघालं असेल की, मुनाफ पटेलला भेटली होती आणि आम्ही एकत्र पार्टी वगैरे केलेली. तेव्हा लोकांनी याचा चुकीचा अर्थ काढला असावा. कारण तेव्हा माझी प्रतिमा मी फ्लर्ट करते अशी होती."आम्ही रिलेशनशिपमध्ये नव्हतो असं मी म्हणणार नाही, कारण मला त्याची ओढ निर्माण झाली होती. कारण आम्ही भेटायचो आणि दोन जण तेव्हाच भेटतात जेव्हा त्यांना आकर्षण असतं. आकर्षण होतं, मग आम्ही प्रेमात पडलो. प्रेम तर होतं, पण त्याला मी आता काय बोलू. चला आता हेच सांगते की ते वन नाईट स्टॅंडसारखं होतं.", असं ती पुढे म्हणाली.भारतीय संघाने २०११ साली वनडे वर्ल्डकप जिंकत अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर वर्ल्ड चॅम्पियन होण्याचा मान पटकावला होता. दरम्यान २०११ च्या वर्ल्डकप विजेत्या संघातील एका खेळाडूवर बॉलीवूड अभिनेत्री पाखी शर्मा हिने धक्कादायक आरोप केले आहेत. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत टीम इंडियाच्या स्टार खेळाडूवर तिने 'वन नाईट स्टॅन्ड' केल्याचा मोठा दावा केला आहे.

## करीना कपूरच्या मनात आजही भीती

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानवर गेल्या वर्षी १६ डिसेंबर, २०२४ च्या मध्यरात्री एका अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने हल्ला केला. मुंबईतील राहत्या घरी अभिनेत्यावर अज्ञात व्यक्तीकडून हा प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. सैफवरील या हल्ल्यामुळे बॉलीवूड विश्वासह अवघा देश हादरला होता. या हल्ल्यात सैफच्या पाठीत शस्त्र रुतलं होतं. रुतलेलं शस्त्र काढण्यासाठी लीलावती रुग्णालयात सैफ अली खानवर शस्त्रक्रियाही झाली होती. या घटनेनंतर कपूर कुटुंबीयांना मोठा धक्का बसला होता. तसेच यामुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं होतं आणि ते वातावरण अजूनही आहे, असं नुकतंच करीनानं एका मुलाखतीत सांगितलं. बरखा दत्तला दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान, करीनानं या घटनेबद्दलची सविस्तर माहिती दिली. तसेच या हल्ल्याचा तिच्या लहान मुलांवर कसा परिणाम झाला? याबद्दलही करीनानं तिच्या भावना व्यक्त केल्या.

## छडी लागे छम छम!



अलीकडच्या काळात टेलिव्हिजन मालिकांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. छोट्या पडद्यावरील मालिकांची लोकप्रियता ही टीआरपीच्या आधारे ठरवली जाते. टीआरपीमध्ये सातत्य राखण्यासाठी महाएपिसोड्स, विविध ट्विस्ट, पाहुण्या कलाकारांच्या एन्ट्री असे नवनवीन उपक्रम वाहिन्यांकडून राबवले जातात. तर, गेल्या काही दिवसांपासून नव्याने सुरू होणाऱ्या मालिकांचं काहीसं हटके प्रमोशन देखील करण्यात येत आहे. आजपासून ( ३० जून ) 'झी मराठी' वाहिनीवर 'कमळी' ही नवीन मालिका सुरू होत आहे. यामध्ये अभिनेत्री विजया बाबर प्रमुख भूमिका साकारत आहे. खेडेगावात राहणारी, अभ्यासात प्रचंड हुशार आणि मुंबईत जाऊन उच्चशिक्षण घ्यायचं असं स्वप्न पाहणारी 'कमळी' प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यासाठी सज्ज होत आहे आणि याच 'कमळी'ची शिक्षका होऊन मालिकेत एन्ट्री घेतेय बॉलीवूडची लोकप्रिय अभिनेत्री विद्या बालन.विद्या आणि कमळीचा एक खास व्हिडीओ 'झी मराठी' वाहिनीने सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये विद्या कमळीला काही प्रश्न विचारते, "देशाची आर्थिक राजधानी कोणती?" यावर कमळी "मुंबई..." असं उत्तर देते. यानंतर विद्या नायिकेला "मुंबईतील विमानतळाचं नाव काय?" असा दुसरा प्रश्न विचारते. यावर कमळी "छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ" असं उत्तर देते.

## छाया कदम यांनी अनुभवली पंढरपूरची वारी

आषाढाची चाहूल लागताच वारकऱ्यांना मनाला ओढ लागते ती पंढरीच्या विठुरायाचं सावळे रूप पाहण्याची, त्याला भेटण्याची आणि त्याचं दर्शन घेण्याची. आषाढी वारीनिमित्त अनेक वारकरी मंडळी 'भेटीचिया ओढ लागलीसी डोळा' म्हणत पंढरपूरच्या दिशेने प्रवास करत असतात. हा सोहळा अवघा महाराष्ट्र तल्लीन होऊन पाहतो. वारीचा हा अनोखा सोहळा अनुभव अनुभवण्यासाठी असंख्य वारकरी पालखीत सहभागी होत असतात. सामान्य वारकऱ्यांबरोबरच मराठी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकार मंडळीही वारीत सहभागी होतात आणि सामान्य वारकऱ्यांसह देहभान हरपून जातात. यंदाच्या पंढरपूरच्या वारीतही काही मराठी कलाकारांनी सहभाग घेतला होता. सायली संजीव, सायली पाटील, आलापिनी, कश्मिरा कुलकर्णी असे अनेक मराठी कलाकार यंदाच्या वारीत सहभागी झाले आहेत.अशातच अभिनेत्री छाया कदम यादेखील यंदाच्या वारीत सहभागी झाल्या आहेत आणि याची खास झलक त्यांनी आपल्या सोशल मीडियावर शेअर केली आहे. छाया कदम सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या विविध लूक्समधील फोटो शेअर करत असतात. अशातच त्यांनी नुकताच शेअर केलेला वारीचा व्हिडीओ चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे.छाया कदम यांनी शेअर केलेल्या या वारीच्या व्हिडीओमध्ये त्या वारीतील अश्वांचं दर्शन घेत असल्याचं पाहायला मिळत आहे. तसंच त्या रिंगण



## बॉलीवूड अभिनेत्री दोन वर्षांनी दुसऱ्यांदा झाली आई

बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रूझ दुसऱ्यांदा आई झाली आहे. पहिला मुलगा दोन वर्षांचा झाल्यानंतर आता तिने तिच्या दुसऱ्या मुलाचे स्वागत केले आहे. तिने इन्स्टाग्रामवर पोस्ट करून दुसऱ्या मुलाच्या जन्माची माहिती चाहत्यांबरोबर शेअर केली. इतकंच नाही तर तिने बाळाची पहिली झलकही दाखवली आहे. बाळाचं नाव काय ठेवलं, तेही इलियानाने सांगितलं. इलियाना डिक्रुझचं चौकोनी कुटुंब पूर्ण झालं आहे. ती व तिचा जोडीदार मायकल डोलन पुन्हा आई-बाबा झाले आहेत. इलियानाने १ ऑगस्ट २०२३ रोजी तिच्या पहिल्या मुलाचं स्वागत केलं होतं. तिच्या मुलाचं नाव कोआ फीनिक्स डोलन ठेवलंय. मुलाच्या जन्मानंतर ती चित्रपटांपासून दूर आहे. बाळाच्या संगोपनात व्यग्र असलेल्या इलियानाने नवीन वर्षानिमित्त एक व्हिडीओ शेअर केला होता. या व्हिडीओतून तिने ती दुसऱ्यांदा आई होणार असल्याची गुड न्यूज दिली होती.इलियानाने ही आनंदाची बातमी दिल्यावर चाहत्यांनी व सेलिब्रिटींनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. प्रियांका चोप्रा, अथिया शेट्टी, विद्या बालन, मलायका अरोरा, करणवीर शर्मा, सोफी चौधरी, रिद्धिमा तिवारी, डब्बू मलिक, अंजना सुखानी, जहीर इक्बालसह अनेकांनी इलियानाला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच तिच्या लाडक्या मुलावर प्रेमाचा वर्षाव केला आहे.इलियाना डिक्रुजच्या पतीचे नाव मायकल डोलन आहे. तिने २०२३ मध्ये त्याच्याशी लग्न केलं आणि त्याच वर्षी ती आई झाली. तिने लग्नाची बातमी लपवून ठेवल्याने लग्न न करताच इलियाना आई झाल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आता ती दुसऱ्यांदा आई झाली असून तिचं चौकोनी कुटुंब पूर्ण झालं आहे. बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रूझ दुसऱ्यांदा आई झाली आहे. पहिला मुलगा दोन वर्षांचा झाल्यानंतर आता तिने तिच्या दुसऱ्या मुलाचे स्वागत केले आहे. तिने इन्स्टाग्रामवर पोस्ट करून दुसऱ्या मुलाच्या जन्माची माहिती चाहत्यांबरोबर शेअर केली. इतकंच नाही तर तिने बाळाची पहिली झलकही दाखवली आहे. बाळाचं नाव काय ठेवलं, तेही इलियानाने सांगितलं. \

# बुमराह दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध!

## जसप्रीत बुमराह सर्व पाचही सामने खेळताना दिसणार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत वि. इंग्लंड दुसरा कसोटी सामना बर्मिंगहममध्ये खेळवला जाणार आहे. दुसऱ्या कसोटीपूर्वी भारतीय संघाला दिलासादायक बातमी मिळाली आहे. टीम इंडियाचा महत्त्वाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुसरा कसोटी सामना खेळण्यासाठी उपलब्ध असल्याचे संघाच्या कोचने सांगितलं आहे.**




बुमराह इंग्लंडविरूद्ध होणाऱ्या ५ कसोटी सामन्यांपैकी ३ सामनेच खेळणार आहे. यामुळे बुमराह दुसरा कसोटी सामना खेळणार नसल्याची चर्चा होती. पण आता संघाच्या कोचने बुमराह दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध असणार असल्याची माहिती दिली आहे. २ जुलैपासून दोन्ही संघांमधील कसोटी सामना खेळवला जाणार आहे.भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेट म्हणाले, तो खेळण्यासाठी उपलब्ध आहे. आम्हाला सुरुवातीपासूनच माहित आहे की तो पाचपैकी फक्त तीन सामने खेळणार आहे. अर्थातच गेल्या कसोटीनंतर रिकव्हर होण्यासाठी त्याच्याकडे आठ दिवस होते. पण परिस्थिती, वर्कलोड आणि पुढील चार सामने आम्ही कश्याप्रकारे मॅनेज करू शकू, याचा विचार करता आताच कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारताच्या सराव सत्रात बुमराह नेहमीप्रमाणे गोलंदाजी करताना दिसला. दुसरी कसोटी २ जुलै रोजी एजबेस्टन, बर्मिंगहम येथे खेळवला जाईल. बुमराहच्या गोलंदाजीचे अनेक व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामुळे दुसऱ्या कसोटीसाठी त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते.टीम इंडियाचे सहाय्यक कोच म्हणाले, "इतर खेळाडूंचा वर्कलोडबाबत माहिती घेत आम्ही बुमराहबाबत निर्णय घेऊ.

पण तसं पाहता हो तो दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध आहे." भारताच्या सहाय्यक प्रशिक्षकाने माहिती दिली की बुमराह पूर्णपणे फिट आहे आणि त्याला दुखापत होण्याची कोणतीही भिती नाही. रायन डोशेट म्हणाले, "बुमराह खेळण्यासाठी तयार आहे. पण हे चार कसोटी बुमराहच्या खेळण्याच्या दृष्टीने कसे मॅनेज करू यावर अवलंबून असणार आहे.

त्यामुळे जर आम्हाला वाटत असेल की त्याला या कसोटीत खेळण्याची आवश्यकता आहे, तर आम्ही शेवटच्या क्षणी हा निर्णय घेऊ. मी खेळपट्टी कशी असेल याबद्दल बोलत आहे. बुमराहला लॉर्ड्स आणि कदाचित मँचेस्टर किंवा ओव्हलवरील सामन्यासाठी थांबवायचं का? तर ते या सर्व गोष्टींवर अवलंबून आहे."कोच डोशेट यांच्या वक्तव्यानंतर आता जसप्रीत बुमराह दुसऱ्या कसोटीत खेळणार की नाही, किंवा तो खेळणार नसेल तर त्याच्या जागी कोणाला संधी मिळणार, यावर सर्वांच्या नजरा असतील. बुमराह इंग्लंडविरूद्ध होणाऱ्या ५ कसोटी सामन्यांपैकी ३ सामनेच खेळणार आहे. यामुळे बुमराह दुसरा कसोटी सामना खेळणार नसल्याची चर्चा होती. पण आता संघाच्या कोचने बुमराह दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध असणार असल्याची माहिती दिली आहे. २ जुलैपासून दोन्ही संघांमधील कसोटी सामना खेळवला जाणार आहे.भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन डे डोशेट म्हणाले, तो खेळण्यासाठी उपलब्ध आहे. आम्हाला सुरुवातीपासूनच माहित आहे की तो पाचपैकी फक्त तीन सामने खेळणार आहे.

### दुसरी कसोटी 2 जुलै रोजी

अर्थातच गेल्या कसोटीनंतर रिकव्हर होण्यासाठी त्याच्याकडे आठ दिवस होते. पण परिस्थिती, वर्कलोड आणि पुढील चार सामने आम्ही कश्याप्रकारे मॅनेज करू शकू, याचा विचार करता आताच कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी भारताच्या सराव सत्रात बुमराह नेहमीप्रमाणे गोलंदाजी करताना दिसला. दुसरी कसोटी २ जुलै रोजी एजबेस्टन, बर्मिंगहम येथे खेळवला जाईल. बुमराहच्या गोलंदाजीचे अनेक व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामुळे दुसऱ्या कसोटीसाठी त्याला प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते.टीम इंडियाचे सहाय्यक कोच म्हणाले, "इतर खेळाडूंचा वर्कलोडबाबत माहिती घेत आम्ही बुमराहबाबत निर्णय घेऊ. पण तसं पाहता हो तो दुसऱ्या कसोटीसाठी उपलब्ध आहे.

# कोहलीचा पुतण्या गाजवणार क्रिकेटचे मैदान

## दिल्ली प्रीमियरमधून होणार एन्ट्री; सेहवागच्या दोन्ही लेकांना देणार टक्कर

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विराट कोहलीने टी-२० क्रिकेट आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. विराट कोहलीची आंतरराष्ट्रीय कारकीर्द आता शेवटच्या टप्प्यात आली आहे. पण आता कोहली कुटुंबातून अजून एक क्रिकेटपटू क्रिकेटच्या मैदानावर पाऊल ठेवत आहे. विराट कोहलीचा पुतण्या दिल्ली प्रीमियर लीगमध्ये उतरत आहे.**

दिल्ली प्रीमियर लीगच्या पुढील हंगामाचा लिलाव २ आणि ३ जुलै रोजी होणार आहे आणि दिल्लीचे अनेक उदयोन्मुख खेळाडू यात सहभागी होताना दिसतील. या खेळाडूंमध्ये एक नाव आहे आर्यवीर कोहली, जो विराटचा पुतण्या आहे. लक्षवेधक गोष्ट म्हणजे यावेळी वीरेंद्र सेहवागचे दोन्ही लेक आर्यवीर आणि वेदांत सेहवाग हे देखील या लीगमध्ये दिसणार आहेत. डीपीएलच्या बोलीसाठी या दोघांचीही नावे निवडण्यात आली आहेत.आर्यवीर कोहली हा विराट कोहलीचा मोठा भाऊ विकास कोहलीचा मुलगा आहे. आर्यवीर कोहली हा त्याचा काका विराटसारखा फलंदाज नाही तर एक फिरकीपटू आहे. तो पश्चिम दिल्ली क्रिकेट अकादमीमध्ये विराट कोहलीचे प्रशिक्षक राजकुमार शर्मा यांच्याकडून प्रशिक्षण घेतो. आर्यवीर कोहलीला लिलावाच्या



सी श्रेणीत स्थान देण्यात आले आहे.

गेल्या हंगामात त्याने दिल्ली अंडर १६ मध्ये नोंदणी केली होती. आर्यवीर आयपीएल दरम्यान विराट कोहलीसह रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या जर्सीमध्ये दिसायचा पण आता हा खेळाडू दिल्ली प्रीमियर लीगमध्ये खेळताना दिसणार आहे.वीरेंद्र सेहवागचे दोन्ही लेक दिल्ली प्रीमियर लीगमध्ये दिसणार आहेत. आर्यवीर सेहवागच्या मोठ्या मुलाचं नावे आहे, जो १७ वर्षांचा आहे. सेहवागचा मोठा लेक दिल्लीच्या अंडर-१९ संघाचा भाग आहे आणि हल्लीच त्याने मेघालयविरूद्ध २९७ धावांची विस्फोटक खेळी केली होती. या खेळाडूला दिल्ली प्रीमियर लीगच्या बी कॅटेगरीमध्ये ठेवण्यात आलं आहे. सेहवागचा दुसरा मुलगा वेदांत सेहवाग यालाही बी कॅटेगरीमध्ये ठेवण्यात आलं आहे, तो दिल्लीच्या अंडर-१७ संघाचा भाग आहे. वेदांत एक ऑफस्पिनर आहे.दिल्ली प्रीमियर लीगमध्ये यंदा दोन नवे संघ खेळणार आहेत. यामध्ये ईस्ट दिल्ली रायडर्स, नॉर्थ दिल्ली स्ट्रायकर्स, वेस्ट दिल्ली लायन्स, साउथ दिल्ली सुपरस्टार्स, ओल्ड दिल्ली-सिक्स आणि सेंट्रल दिल्ली किंग्ज यांचा समावेश आहे. यावेळी आउटर दिल्ली आणि नवी दिल्ली फ्रँचायझी देखील मैदानावर दिसतील. गेल्या वेळी प्रियांश आर्यसारखा खेळाडू या लीगमधून प्रसिद्धीच्या झोतात आला होता.

### दिल्ली प्रीमियर लीगमध्ये दोन नवे संघ

दिल्ली प्रीमियर लीगच्या पहिल्या हंगामात प्रियांश आर्यने ६ चेंडूत ६ षटकार मारले होते. त्यानंतर पंजाब किंग्जने प्रियांशवर ३ कोटी ८० लाख रूपयांची बोली लावली. त्याने यासह आयपीएल २०२५ मध्ये चमकदार कामगिरी करत ५४५ धावा पहिल्याच हंगामात केल्या. डीपीएलच्या बोलीसाठी या दोघांचीही नावे निवडण्यात आली आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। मंगळवार।
। दि. 1 जुलै 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# FACT CHECK : वस्तुस्थिती काय आहे?


# रुपीनगर-तळवडेतील घारजाई माता मंदिर पाडणार?

## स्थानिक नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होतोय का?

। पिंपरी- चिंचवड ।

**अविनाश आदक । महाईन्यूज ।**


**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नवीन प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. त्यासाठी हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. अद्याप हा आराखडा अंतिम केलेला नाही. पण, आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीकोनातून विकास आराखड्यावरुन "कहीं पे निगाहें... कहीपे निशाना..." असा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न काही समाजमाध्यमे आणि राजकीय संधीसाधुंनी पिंपरी-चिंचवडकरांशी दिशाभूल करण्याचा विडाच उचलला आहे. नेहमीप्रमाणे 'महाईन्यूज' अशा 'फेक नॅरेटिव्ह'च्या विरोधात ठाम भूमिका घेणार आहे. डीपीबाबत आम्ही दूध का दूध आणि पाणी का पाणी करणार आहोतच..!**






काही दिवसांपूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये चिखलीतील एका जाहीर कार्यक्रमात आमदार महेश लांडगे यांनी केलेले वक्तव्य तुम्हाला ज्ञान असेल... महेश लांडगे म्हणाले होते की, "डीपीबाबत पॉडकास्ट आणि सोशल मीडिया चालवणाऱ्यांचा मेंदू अमेरिकेत प्रदर्शनासाठी ठेवला पाहिजे. " महेश लांडगेंचे हे विधान पिंपरी-चिंचवडकरांनी खरंच ध्यानात घेतले पाहिजे. रुपीनगर- तळवडे या भागात 'रेड झोन' आढळतो म्हणजे विकासकामे आणि आरक्षणांच्या विकासाला मर्यादा पडतात. त्यातच आता तेथील घारजाई माता मंदिरावरुन 24 मीटर रस्ता आरक्षीत केला आहे. त्यामुळे "मंदिर पाडण्यात येईल... भाविकांचे श्रद्धास्थान असलेले हे मंदिर आता जमीनदोस्त होणार..." असा नारा देत स्थानिक नागरिकांना भडकावण्यात येत आहे. अगदी बाबरी पाडल्यानंतर जसा देशव्यापी प्रश्न निर्माण झाला, तशाप्रकारे अगदी बैठका.. मिटिंगा घेवून... लोकांना भुलवण्याचा प्रयत्न सुरू आहे. टार्गेट कोण... सत्ताधारी भाजपा... आणि याला खतपाणी कोण घालतं आहे... हे सर्वज्ञात आहे. घारजाई माता मंदिराचा प्रश्न राजकीय मूळीच नाही... आम्ही याबाबत माहिती घेतली. 2008-09 मध्ये झालेल्या मंजुर विकास आराखड्यामध्ये सदर रस्त्याच्या आखणीमध्ये मंदीर बाधित होत आहे. म्हणजे आजपासून 17 वर्षांपूर्वी हा विकासआराखडा मंजूर झाला. त्यामध्ये घागजाई मंदिर बाधित झाले... पण, तो रस्ता शिफ्ट करावा किंवा आरक्षणात बदल करावा...






असे तत्कालीन सत्ताधाऱ्यांना वाटले नाही. किंवा त्यामध्ये कोणता बदल झाला नाही. मंजूर डीपीमध्ये बाधित असतानाही भाजपा सत्ताकाळात मंदिरावर कारवाई झाली नाही. मग, आताच भाजपा सरकारमध्ये कारवाई होईल... असे पिल्लू का सोडले जात आहे...तर महापालिका निवडणुका तोंडावर आल्या आहेत.

### जुना डीपीमध्ये स्पष्ट आहे...

'T' म्हणले टेंपल... उल्लेख दिसतो. मंदिर बाधित आहे. जो डीपी 2008-09 मध्ये मंजुर केला आहे. आता नव्या डीपीत 'M' असा उल्लेख आढळतो. जुना डीपी आणि नवा डीपी याची तुलनात्मक पाहणी केली. तर मंदिर जिथे आहे, तिथेच दाखवण्यात आले आहे. मग, मंदिर पाडण्यासाठी 80 फूट रस्ता शिफ्ट केला, हा जावईशोध कोणी लावला? कशासाठी लोकांची डोकी भरकवायची आहेत? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.


### घारजाईमाता सुबुद्धी देवो...

आता नव्या डीपीमध्ये पूर्वीच्याच मंजूर डीपीप्रमाणे रस्त्याची आखणी दर्शवण्यात आली आहे. पण, पूर्वीचा रस्ता 80 फूट शिफ्ट केला... असा जावईशोध काही लोकांनी लावला. त्यामुळे हा सर्व प्रकार चर्चेत आला. सदर रस्ता मंजुर विकास योजनेप्रमाणेच कायम केला आहे. मंदिर बाधित व्हावे... म्हणून 80 फूट रस्ता शिफ्ट केला, हा 'फेक नॅरेटिव्ह' आहे. वस्तुस्थिती तशी नाही... अशा लोकांना साक्षात घारजाई माता सुबद्धी देवो... असे म्हणावे लागेल. कारण, विकास आराखड्यामध्ये धार्मिक किंवा प्रार्थनास्थळांसाठी आरक्षण नसते.

### पिंपरी-चिंचवडकरांसमोर वस्तुस्थिती यावी...

एक संदर्भ या ठिकाणी महत्त्वपूर्ण ठरतो... कुदळवाडी येथे ऐतिहासिक अतिक्रमण कारवाई झाली. त्यावेळी गावठाणातील मंदिरांनाही प्रशासनाने नोटीसा दिल्या होत्या. यावर आमदार महेश लांडगे यांनी घेतलेली भूमिका निश्चितच स्वागतार्ह होती... "सदर गावांचा समावेश महापालिकेत होण्यापूर्वी आणि ग्रामपंचायत स्थापनेपासून किंवा पूर्वीपासून असलेली मंदिरांना 'अभय' द्यावे. " असा आग्रह त्यांनी धरला आणि त्यानुसार पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर एखाद्या मंदिराची विटसुद्धा हालली आहे, असे ऐकिवात नाही. असो... तूर्तास, घागजाई माता मंदिराच्या मुद्यावरुन जे कोणी राजकारण करु पाहात आहेत... ती मंडळी विकास आराखड्याचे वस्तुनिष्ठ आवलोकन करतील आणि पिंपरी-चिंचवडकरांसमोर खरी परिस्थिती मांडतील, अशी अपेक्षा करुयात.


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292